**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८०/२०२४ मधील नि.५ खालील आदेश**

**आनंदीबाई शिंदे वगैरे वि.सुभद्रा मराठे वगैरे**

**CNR NO. MHST050007602024**

अर्जदार यांनी सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ अंतर्गत दाखल करुन सामनेवाला नं.२ यांनी सामनेवाली नं.१ हिस संपादनाची रक्कम देवू नये असा अंतरिम मनाई आदेश मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार या मूळ पुरुष म्हातारा नागू मराठे याच्या मुली असून त्यांच्या मिळकतीत त्यांचा वारस म्हणून हक्क आहे. मूळ पुरुष हे दि.२०.०९.१९६५ रोजी मयत झाले. त्यानंतर शेत मिळकती संदर्भात फेरफार नं.२२२२ होवून सन १९६८ साली मूळ पुरुष यांचा मुलगा व अर्जदार यांचा सख्खा भाऊ सहदेव म्हातारा मराठे यांच्या नावाची नोंद ए.कू.मॅ. म्हणून झाली. वडिलार्जित मिळकतीत सहदेव व अर्जदार यांचा प्रत्येकी १/४ हिस्सा आहे. वडिलार्जित मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही.

३. फेरफार नं.२२२२ हा वारस रजिष्टर नं. ३८० नुसार नोंदविण्यात आला. वारस रजिष्टर नं. ३८० मध्ये अर्जदार यांची नावे नमूद आहेत. फेरफार नं.२२२२ व वारस रजिष्टर नं. ३८० नुसार अर्जदार या मूळ पुरुष यांच्या वारस असल्याचे कथन करतात. अशी परिस्थिती असता आर.टी.एस.कावि.८१०/पाटण/७१६/१९८९ वरुन

सहदेव म्हातारा मराठे व बापू म्हातारा मराठे या दोघांची नावे ८–८ आणे करीता महसुल रेकॉर्ड सदरी फेरफार नं.७९ ने नोंदविण्यात आली. त्यानंतर दि. ०१.०६.१९९३ रोजी फेरफार नं.१५३ नुसार सहदेव याच्या मुलाच्या नावाची नोंद झाली. अर्जदार यांचे असे कथन आहे की, फेरफार नं.७९ व १५३ यांची नोंद करण्यापूर्वी अर्जदार यांना कायद्यानुसार नोटीसा देण्यात आलेल्या नाहीत. महसुल नोंदी अन्वये अर्जदार यांचा वारसा हक्क संपुष्टात येत नाही. अर्जदार यांनी कधीही कोणत्याही प्रकारे हक्कसोडपत्र करुन दिलेले नाही.

४. सन १९९५–९६ च्या दरम्यान वडिलार्जित मिळकती या शासनामार्फत संपादीत करण्यात आल्या. त्यानंतर विस्तापितांचे पुनर्वसन करण्याकरीता प्रकरण क्र./पुनर्व/वांग म/रो.रक्कम/कावि ३१५–२०१९ या कामी चौकशी होवून दि.३.७.२०१९ रोजी न्यायनिर्णय झाला व त्याकामी उपविभागीय अधिकारी यांनी अर्जदार व सामनेवाला यांचेत वारसाबाबत वाद असल्याने अर्जदार यांनी दिवाणी न्यायालयाकडून वारसाबाबत आदेश घ्यावा असे निर्देशित केले. या कारणास्तव अर्जदार यांनी मूळ अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

५. सामनेवाला क्र.१ हिस मंजूर झालेली रक्कम सदर अर्ज गुणदोषावर निकाली होईपर्यंत सामनेवाला क्र.२ यांनी रक्कम अदा करु नये अशी मनाई मागितलेली

आहे.

६. सामनेवाली क्र.१ हिने नि.२४ वर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतलेली आहे. हरकतीमध्ये खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

i) या न्यायालयास सदरचा अर्ज चालविण्यास अधिकारक्षेत्र नाही.

ii) सदर अर्जास non joinder of necessary party ची बाधा येते.

iii) फेरफार क्र.७९ ची नोंद होतेवेळी १९८९ साली अर्जदार यांनी वडिलोपार्जित मिळकतीमधील हक्क तोंडी हक्कसोडपत्राद्वारे सोडलेला आहे.

iv) अर्जदार यांनी फेरफार क्र. ७९ व १५३ बाबत हरकती आजपर्यंत नोंदविलेल्या नाहीत.

v) नुकसान भरपाईची रक्कम मुळ अर्जात नमूद केलेली नाही. तसेच त्याबाबत मूळ अर्जात कोणतीही मागणी केलेली नाही. रक्कमेबाबत योग्य तो कोर्ट फी स्टँप दिलेला नाही.

vi) अर्जदार यांनी वारसाबाबत, फेरफाराबाबत व भूसंपादनाच्या निवाडयाबाबत कोणतेही हक्कज्ञापन मागितलेले नाही.

vii) अर्जदार यांनी महत्वपूर्ण बाबी न्यायालयापासून लपवून ठेवलेल्या आहेत.

viii) सामनेवाला क्र.२ हे शासन असल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८०

प्रमाणे नोटीस देणे बंधनकारक होते. ती पुर्तता न झाल्यामुळे अर्ज चालण्यास पात्र नाही.

ix) अर्ज मंजुर झालेस सामनेवाला क्र.१ हिचे अपरिमित व कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे.

वर नमूद कारणास्तव अर्जदार यांचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

७. अर्जदार व सामनेवाला यांची परस्पर विरोधी कथने लक्षात घेता, कागदपत्रांची पाहणी करता व युक्तीवाद ऐकता पुढील मुद्दे माझे समक्ष उभे राहतात. त्यावर मी माझे कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांच्या बाजुने सकृतदर्शनी केस आहे काय ? | ... नाही. |
| २. | अनुकुलतेचा समतोल अर्जदार यांचे बाजुने आहे का ? | ... नाही |
| ३. | अर्ज नामंजूर झालेस अर्जदार यांची अपरिमित हानी होईल का? | ... नाही |
| ४. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत –**

कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी सर्व मुद्दे एकत्रित विचारात घेत आहे.

८. अर्जदारतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, सामनेवाली क्र.१ यांना अर्जदार या मूळ पुरुष म्हातारा नागू मराठे याच्या वारस असल्याचे मान्य आहे. महसुल नोंदींन्वये अर्जदार यांचा वडिलोपार्जित मिळकतीतील हक्क नष्ट होत नाही. तसेच अर्जदार यांनी भूसंपादनाच्या अथवा पुनर्वसनाच्या कोणत्याही निर्णयास आव्हानीत केले नसल्यामुळे या न्यायालयास अधिकारक्षेत्र प्राप्त होते. अर्जदार या मूळ पुरुष याच्या वारस असल्यामुळे सामनेवाला क्र.१ हिस मिळणा–या रक्कमेमध्ये अर्जदार यांचाही हिस्सा असल्यामुळे तसेच त्यांच्यात अद्याप सरसनिरस मानाने वाटप झाले नसल्यामुळे अर्जदार मागणी करतात त्याप्रमाणे त्या मनाई मिळण्यास पात्र आहेत. सदर म्हणण्याच्या पृष्ट्यर्थ अर्जदारतर्फे मा.सर्वोच्च न्यायालयाचे खालील न्यायनिर्णय दाखल करण्यात आलेले आहेत.

*i)* *Bhagwant P. Sulakhe Vs. Digambar Gopal Sulakhe* reported in *1985 DGLS (SC) 307.*

*ii)* *Jai Singh and ors. Vs. Gurmej Singh* reported in *2009*

*DGLS (SC) 58.*

*iii)* *Jitendra Singh Vs. State of Madhya Pradesh and Others* reported in *2021 DGLS (SC) 439.*

९. सामनेवालातर्फे नि.४५ वर लेखी युक्तीवाद दाखल करण्यात आला तसेच तोंडीही युक्तीवाद करण्यात आला. अर्जदार यांनी मूळ अर्ज केवळ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी रक्कमेबाबत कोणताही उल्लेख मूळ अर्जात व सदर अर्जात केलेला नाही व त्यानुसार कोर्ट फी स्टँप दिलेला नाही. अर्जदार यांनी अद्यापपर्यंत फेरफार क्र.७९ व १५३ बाबत कोणतीही हरकत घेतलेली नाही. मूळ पुरुष म्हातारा मराठे याला बापू नावाचा मुलगा होता. त्याच्या वारसांना याकामी समाविष्ट करण्यात आलेले नाही. मूळ अर्जामध्ये वडिलार्जित मिळकतींबाबत कोणताही सविस्तर खुलासा केलेला नाही. अशा परिस्थितीत मनाईचा अर्ज चालण्यास पात्र नाही.

१०. अर्जदार यांनी सामनेवाला क्र.२ यांनी रक्कम अदा करु नये अशी हरकत घेतलेली आहे. सदर हरकतीद्वारे अर्जदार अप्रत्यक्षरित्या भूसंपादनाची कारवाई व पुनर्वसनाची कारवाई आव्हानीत करत आहेत. सदरची कारवाई या न्यायालयासमोर आव्हानीत करता येणार नाही. या न्यायालयास त्याबाबत अधिकारक्षेत्र प्राप्त होत नाही. त्याबाबतचे अधिकारक्षेत्र मा. उच्च न्यायालयास आहेत. अर्जदार यांनी महत्वपूर्ण बाबी लपविल्या असल्यामुळे व दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० ची नोटीस न दिल्यामुळे

अर्जदार यांची मनाईची दाद मंजूर करता येणार नाही. सदर म्हणण्याच्या पृष्ट्यर्थ सामनेवालातर्फे मा.सर्वोच्च न्यायालयाचे व मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खालील न्यायनिर्णय दाखल करण्यात आलेले आहेत.

*i)* *Commissioner, Bangalore Development Authority & Anr. Vs. Brijesh Reddy & Anr.* reported in *2013 CJ (SC) 78.*

*ii)* *Govt. of Kerala and Ors. Vs. Sudhir Kumar Sharma and Ors.* reported in *2013 CJ (SC) 1022.*

*iii)* *Hari Shiva Patil Vs. Sadashiv Krishnaji Kulkarni* reported in *2018 CJ (Bom) 405.*

*iv)* *Harcharanjit Singh Thind Vs.Deeksha Thind* reported in *2008 CJ (Bom) 1010.*

११. अर्जदार यांनी केवळ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता मूळ अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी वारस बापू याला अभिलेखावर न घेतल्यामुळे अर्जदार यांना नेमका किती हिस्सा मिळतो हे निश्चित होत नाही. तसेच अर्जदार यांनी मूळ अर्जामध्ये रक्कमेबाबत कोणताही तपशील नमूद केलेला नाही तसेच रक्कमेबाबत कोणतीही दाद मागितलेली नाही.

१२. अर्जदार यांनी सामनेवाला क्र.२ यांनी सामनेवाली क्र.१ हिस रक्कम अदा करु नये अशी मनाई मागितलेली आहे. अर्जदार यांनी सदरची मनाई मागून

अप्रत्यक्षरित्या भूसंपादनाची व पुनर्वसनाची कारवाई आव्हानीत केलेली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने व मा. उच्च न्यायालयाने वर नमूद न्यायनिर्णयांमध्ये, महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन कायदा १९८६ चे कलम २२ नुसार तसेच नुकसान भरपाई The right to fair compensation and transparency in land acquisition, rehabilitation and resettlement act 2013 चे कलम ६३ नुसार दिवाणी न्यायालयास अधिकारक्षेत्र येत नसल्याचे न्यायनिर्णयामध्ये नमूद केलेले आहे. अर्जदार यांनी मागितलेली मनाई ही अप्रत्यक्षरित्या भूसंपादन व पुनर्वसनाच्या कारवाईस आव्हानीत करणारी असल्यामुळे कायद्याप्रमाणे दिवाणी न्यायालयास अधिकारक्षेत्र येत नाही. त्याबाबतचे अधिकारक्षेत्र मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांनाच येते.

१३. क्रमांक पुनर्वसन/कावि/१२१/२५ चे निर्णयानुसार सामनेवाली क्र.१ हिने प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्यामध्ये तिने भविष्यात दिवाणी कोर्टाने आदेश केलेस अर्जदार यांच्या हिश्श्याची रक्कम देण्यास तयार आहे असे नमूद केले आहे. उपविभागीय अधिकारी यांनी सदर प्रकरणामध्ये किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८०/२०२४ म्हणजेच मूळ अर्जाच्या निर्णयास अधीन राहून गट क्र.२९१ क्षेत्र ०.४१.९१ हे.आर.चे इतर हक्कात या अर्जाच्या निर्णयास अधीन राहून हस्तांतरणास बंदी असा शेरा नमूद केलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांचा अर्ज नामंजूर झालेस त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

१४. अर्जदार यांनी भूसंपादनाची व पुनर्वसनाची कारवाई अप्रत्यक्षरित्या आव्हानीत केल्यामुळे महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन कायदा १९८६ चे कलम २२ नुसार तसेच नुकसान भरपाई The right to fair compensation and transparency in land acquisition, rehabilitation and resettlement act 2013 चे कलम ६३ नुसार या न्यायालयास अधिकारक्षेत्र नसल्यामुळे अर्जदार यांचा मनाईचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे उपरोक्त कारणास्तव मी सदर मुद्दयांस त्याप्रमाणे निष्कर्ष देवून मुद्दा क्र.४ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

(१) अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2025.08.21 15:17:38 +0530

ठिकाण – कराड (जे.जे.माने)

दिनांक–२०.०८.२०२५. ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

कराड.